# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210

क्रं.उशिनाग/अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/ ५०८२ /२०१९ दिनांक २१/०८/२०१९

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, सदर, नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन, नागपूर
७. उपसंचालक, उच्च शिक्षण, विभाग, नागपूर
८. संचालक, शास./सर्व प्राचार्य अशासकीय अनु./विना अनु./कायम विना अनु. महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरून सन २०१९-२० करीता महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत/शिष्यवृत्ती/१०८६८, दिनांक २१.०८.२०१९**

केंद्रशासनाच्या एन. एस. पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३. अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ मध्ये महाविद्यालय/ संस्था यांचे एनएसपी पोर्टलवर दुबार नांवाची नोंद असणे, महाविद्यालयांचा AISHE CODE नसणे, एकापेक्षा अधिक महाविद्यालयाचा भ्रमणध्वनी क्रमांक एकच असणे इ. कारणामुळे महाविद्यालयांची/ संस्थाची माहिती NSP पोर्टलवरून नष्ट करण्यात आलेली असून, याबाबत अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, दिल्ली यांच्या दि. ०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार संस्था/ महविद्यालय यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच संचालनालयाच्या दि.२०.७.२०१९ व दि. ०३.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु अद्यापपर्यंत महाविद्यालये/ संस्थाकडून अंत्यत कमी प्रतिसाद मिळालेला आहे.

NSP पोर्टलवर महाविद्यालये /संस्था /विद्यापीठे यांची पुर्ननोंदणी विहीत कालमर्यादत झाली नाही तर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यास अडचण निर्माण होईल तसेच महाविद्यालये/ संस्था/ विद्यापीठे यांना विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्या लॉगीनमधून दिसणार नाहीत. त्यामुळे सर्व महाविद्यालय/ संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधुन ऑनलाईन पद्धतीने AISHE/U-DISE/NCTV/SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुनर्नोंदणी करणे अंत्यत आवश्यक आहे.

5485
2 3 AUG 2019

महाविद्यालय/ संस्था यांनी विहीत कालमर्यादेत NSP पोर्टलवर पुर्ननोंदणी न केल्यास तसेच विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.

**महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठे यांनी NSP पोर्टलवर नोंदणीसाठी ऑनलाईन पद्धतीने भरलेले Form छाननीकरीता माहितगार कर्मचाऱ्यासोबत दिनांक २८.८.२०१९ पर्यंत सहसंचालक, उच्च शिक्षण,** नागपूर **कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावीत. त्या नंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार** नाही **याची नोंद घ्यावी.**

संस्था/ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. संस्था/ महाविद्यालय यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी (ऑनलाईन भरलेल्या अर्जावर नोडल अधिकाऱ्याचा फोटो लावणे आवश्यक आहे.)

२. AISHE/U-DISE/NCTV/SCVT CODE याबाबतचे प्रमाणपत्र

३. महाविद्यालये प्राचार्यांचे आधारकार्ड/ मतदान ओळखपत्र/ ड्रायव्हींग लायसन इ. पैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत.

४. महाविद्यालयाचे (नोडल अधिकारी) संबंधित काम करणारे कर्मचारी यांचे आधारकार्ड/ मतदान ओळखपत्र/ ड्रायव्हींग लायसन इ. पैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत इ कागदपत्रे.

५. महाविद्यालयाचे/ संस्थेचे कव्हरिंग लेटर

**वरील सर्व कागदपत्रे या कार्यालयाद्वारे संचालनालयास सादर केल्यानंतर महाविद्यालयाचे / संस्थेचे/ विद्यापीठाचे नोडल अधिकाऱ्यांच्या मोबाईलवर युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध होईल व विद्यार्थ्यांना अर्ज भरणे व महाविद्यालये/ संस्थांना अर्जावरील पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.**

**महाविद्यालय/ संस्था यांनी विहीत कालमर्यादेत कार्यवाही न केल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासन** वंचित **राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.**

**(डॉ. अर्चना नेरकर)**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर.

**प्रत :-** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे-१ यांचे माहितीस्तव सविनय सादर